## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.४१६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २९/०५/२०१७

**१) समोरील दाराचा कोंढा टिकासने तोडुन सोन्याचे दागीने व नगदी पैशाची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २८/०५/२०१७ चे १५.०० ते ०१.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीचे राहाते घराचे समोरील दाराचा कोणीतरी अज्ञात चोराने टिकासने कोंढा तोडुन आत प्रवेश करून २ सोन्याचे गोफ प्रत्येकी १० ग्रॅम, सोन्याचे कानातील झुमके ५ ग्रॅम, १ सोन्याची अंगठी ४ ग्रॅम, १ सोन्याची नथ ३ ग्रॅम, सोन्याचा मंगळसुत्र ९ ग्रॅम, १ जोड चांदीच्या पायपट्टया ४ तोडे व नगदी ११,०००/रू. असा एकुण १,२७,५००/रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी मोरेश्वर विठोबा वडीकर वय ५३ वर्ष रा. मडेघाट यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**२) शेतातुन वेल सेट मोटार पंपाची चोरी . :–**

दिनांक २६/०५/२०१७ चे १८.०० ते २८/०५/२०१७ चे ०७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी धर्मेद्र वय ४० वर्ष, रा. सालेबर्डी याने आईच्या शेतात विहीरीवर लावलेली ३ एचपी. ची ओपन वेल मोटारपंप किंमती ११,०००/रू. कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. दिघोरी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. चाचेरे पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**३) विषारी औषध प्राशन केल्याने महिलेचा औषधेपचारा दरम्यान मृत्यु . :–**

दिनांक २५/०५/२०१७ चे १८.०० वा. दर. यातील मृतक सौ. सरीता मुकेश राहांगडाले वय २८ वर्ष, रा. येरली ही दि. २५/५/२०१७ विषारी औषध प्राशन केल्याने तीला औषधोपचारा करिता सु. बो. दवाखाना तुमसर येथे भरती केले असता प्रथमोपचार करून तेथील डॉक्टरने सा. रू. भंडारा येथे रेफर केल्याने मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि.२७/५/२०१७ चे १९.४५ वा. मरण पावल्याने पो.स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोशि. मल्होत्रा ब.न. १०६२ चे हस्ते पो.स्टे. तुमसर येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे पो.शि. मल्होत्रा यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. हावरे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) आंबे वेचण्यास गेलेल्या मुलावर आंब्याच्या झाडाची फांदी पडुन औषधोपचारा दरम्यान मुलाचा मृत्यु . :–**

दिनांक २७/०५/२०१७ चे १७.२० वा. दर. यातील मृतक प्रतिक श्रीक्षरण येळणे वय १२ वर्ष, रा. खरबी हा आंब्याचे झाडाखाली आंबे वेचण्या करिता गेला असता आंब्याच्या झाडाची फांदी मृतकाचे अंगावर पडल्याने त्यास औषधोपचारा सा. रू. भंडारा येथे नेले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरून पोस्टे. भंडारा येथे मर्ग ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पो.स्टे. ला आणुन पेश केल्याने सरतर्फे फिर्यादी पो.ना. टिचकुले यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जनबंधु पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

५) रूम मध्ये बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने ईसमाचा मृत्यु . :–

दिनांक २८/०५/२०१७ चे १८.३० वा. दर. यातील मृतक गंगासींग चौकीलाल ठाकुर वय ३० वर्ष, रा. विश्वास नगरे सहदरा दिल्ली ह.मु. आंबाडी हा दारू पाणी पिण्याच्या सवईचा असुन तो फिर्यादीचे घरी ३ वर्षा पासुन किरायाने राहत होता. मृतक ने घटना तारखेला भाडयाची रूम खाली केली होती. व मृतक हा रूम मध्ये बेशुध्द अवस्थेत दिसुन आल्याने त्यास औषधेपचारा करता सा.रू. भंडारा येथे नेले असता डॉक्टरने तपासुन मृत केल्याने फिर्यादी श्रीमती विठाबाई विलास बोरकर वय ६५ वर्ष रा आंबाडी यांचे व डॉक्टरी मेमो वरून पोस्टे. कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मगगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

६) अस्थी विर्सजना करिता गेलेल्या युवकाचा नदीचे पाण्यात बुडुन मृत्यु . :–

दिनांक २८/०५/२०१७ चे १२.०० वा. दर. यातील मृतक अतुल पुरूषोत्तम वैद्य वय २६ वर्ष, रा. तिरावा जिल्हा नागपुर हा आपले आजीचे अस्थी विसर्जनाचे कार्यक्रमा करिता वैजेश्वर नदी घाटावर आला असता नदीचे पाण्यात आंघोळ करित असतांना त्याचे नदीचे खोल पाण्यात तोल जावुन पडुन पाण्याचे प्रवाहात वाहुन पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी अशोक बळीराम वैद्य वय ५२ वर्ष रा ओमसाई नगर पिंपळनेरी रोड चिमुर जिल्हा चंद्रपुर यांचे व डॉक्टरी मेमो वरून पोस्टे. पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.ना. राहांगडाले पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

७) अवैध देशी दारु अडयावर धाडी . :–

दिनांक २८/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. मोहाडी, कारधा, करडी व सिहोरा येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ६० लिटर हातभट्टी दारु किंमती ४०५०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २८/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ४३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२ तीन सिटर वाहनांवरती ०२ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ३९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.